ठाणे शहरातील मानपाडा पोलीस स्टेशन गु.र.नं-३५३/२०१७ या खटल्यामधून उद्भवणाऱ्या न्यायालयीन प्रकरणांमध्ये विशेष सरकारी अभियोक्ता म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या ॲड.श्री. शिशिर हिरे यांना व्यावसायिक फी मंजूर करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांकः एसपीपी १०१७/प्र.क्र.२६८/पोल-१०
गृह विभाग, २ रा मजला, मंत्रालय,
हुतात्मा राजगुरु चौक ,मादाम कामा रोड,
मुंबई-४०० ०३२
दिनांक: २० मार्च २०१९

<u>संदर्भ</u> **शासन अधिसूचना, विधी व न्याय विभाग क्र. एसपीपी २०१८/यु.ओ.आर.०९/ डी-१४, दिनांक १९.०१.२०१८**

शासन निर्णय:

ठाणे शहरातील मानपाडा पोलीस स्टेशन गु.र.नं-३५३/२०१७ मधून उद्भवणाऱ्या न्यायालयीन प्रकरणांमध्ये शासनाच्या वतीने कामकाज पहाण्यासाठी ॲड.श्री. शिशिर हिरे यांची विधी व न्याय विभागाच्या वरील संदर्भाधीन दिनांक १९.०१.२०१८ च्या अधिसूचनेद्वारे विशेष सरकारी अभियोक्ता म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. सबब, प्रस्तुत प्रकरणी ॲड.श्री. शिशिर हिरे यांना खालीलप्रमाणे फी अदा करण्यास शासन मान्यता देत आहे.

अ) प्रतिदिन परिणामकारक सुनावणी फी रुपये- १५,०००/-
ब) प्रतिदिन व्यवसायिक सल्लामसलत फी - ५,०००/-
(पहिल्या १ ते ५ तासाकरिता
क) प्रत्यक्षात केलेला प्रवास व निवास खर्च
ड) आवश्यकता भासल्यास पोलीस संरक्षण

२. प्रस्तुत प्रकरणी ॲड.श्री. शिशिर हिरे यांना अपरिणामकारक सुनावणी फी अथवा इतर कोणतीही फी वा भत्ते अनुज्ञेय असणार नाहीत. परिणामकारक सुनावणीचे दिवस संबंधीत प्रकरणाच्या पर्यवेक्षीय पोलीस उपायुक्त दर्जाहून कमी नाही, अशा

अधिकाऱ्याकडून प्रमाणित करुन घेण्यात यावेत व कोणत्याही प्रकारचे अतिरिक्त प्रदान होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

३. यासाठी येणारा खर्च या विभागाच्या मागणी क्र. बी-१, २०५५ पोलीस - (००) १०९, जिल्हा पोलीस (००) (०१) जिल्हा पोलीस दल - (२०५५ ०१६८) - २८ व्यावसायिक सेवा या लेखाशीर्षाखालील त्या त्या आर्थिक वर्षाच्या मंजूर अनुदानातून व मासिक निधी विवरणपत्रानुसार भागविण्यात येईल.

४. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.२०४/१८/व्यय-७, दिनांक २७.०६.२०१८ अन्वये मिळालेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेताक क्र. २०१९०३२०१३१२२४०७२९असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kishor Shyamrao Bhalerao

Digitally signed by Kishor Shyamrao Bhalerao
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ce6f6edd7e1dfc6b4d6b65b7d93aa1a1dbcf0ec79c7c2143850ff6e8fdcb4c0d, serialNumber=94524ab889e2fa9e6bfe5e1e58426881bc36b968ffd0f45ce2d4bd3ff527ded2, cn=Kishor Shyamrao Bhalerao
Date: 2019.03.20 13:22:47 +05'30'

(किशोर शामराव भालेराव)

उप सचिव (विधि),गृह विभाग,महाराष्ट्र शासन

प्रत,

१. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. पोलीस आयुक्त,ठाणे शहर.
३. महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई .
४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
५. निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.
६. श्री.शिशिर हिरे, १०४, वकीलांचे कार्यालय, अतिरीक्त जिल्हा आणि सत्र न्यायालय, मालेगाव, "सावित्री", एम.गांधी मार्ग (कँम्प रोड), मालेगाव ४२३ २०३.विधी व न्याय विभाग (का १४), मंत्रालय, मुंबई.
७. वित्त विभाग (व्यय- ७), मंत्रालय, मुंबई.
८. निवड नस्ती (पोल-१०).